


UNITE FOR GOOD

# अजिंठा

ऑक्टोबर- २०२५ ● अंक- ४ था



आर.आय.प्रेसिडेंट
रो.फ्रान्सिस्को अरेइझो



डिस्ट्रीक्ट गव्हर्नर
रो.ज्ञानेश्वर शेवाळे



प्रेसीडेंट
रो.गिरीश कुलकर्णी



ऑन.सेक्रेटरी
रो.सुभाष अमळनेरकर



बुले.कमिटी चेअरमन
रो.कॅ.मोहन कुलकर्णी

Rotary | UNITE FOR GOOD
ROTARY CLUB JALGAON
R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26
Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

ऑक्टोबर महिन्यातील हा अंक आपला या वर्षीचा 'अजिंठा' चा चौथा अंक. सप्टेंबर महिन्यात आपण दुर्गादेवीची स्थापना अगदी धमुधडाक्यात साजरी केली. त्या आधी आपण गणेशोत्सव सुद्धा मोठ्या उत्साहात साजरा केला. मित्रांनो हे जे आपले सण असतात ते आपल्या उच्च आणि समृद्ध संस्कृतीचे महान प्रतीक आहे. आपण त्या निमित्त एकत्र येतो. देव देवतांचे मनोभावे पूजन करतो आणि एकूण सर्वांनाच सुखी ठेव अशी प्रार्थना करतो. जिथे कुठे समाजात नुकसानदायी घटना घडता, अपरिमित हानी होते. तिथे आपली रोटरी सदैव तत्परतेने धावून जाते आणि आपल्या परीने मदत कार्यास सहकार्य करते. यावेळी देशात काही ठिकाणी पुरामुळे अतिशय नुकसान झाले. आपण रोटरी तर्फे योग्य ती मदत करतोच पण पर्यावरणाचा तोल ढळणार नाही याकडेही आपण दक्ष रहायला हवे.

यावर्षी सुद्धा आयएमआर रोटरॅक्ट क्लबने अनंत चतुर्दशीला निर्माल्य संकलनाचा अतिशय स्तुत्य असा उपक्रम राबविला. यावर्षीचे आपले आरआय प्रेसिडेंट फ्रान्सेस्को अरेइझो यांच्या लेखातील UNITE FOR GOOD चा त्यांनी सांगितलेला हा संदेश फार महत्त्वाचा आहे. "Unite sepaks to the strength we find in each other. When we unite our talents and resources, not only among our clubs but across partners organisations and communitites, we expand our reach and when we do so consistently over time, we create lasting change."

दसरा आणि दिपावलीच्या आपणा सर्वांना शुभेच्छा ! आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा.

**– रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो, रोटरी प्रणाम !

विजयादशमी आणि दीपावलीच्या आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा. आपल्या व परिवाराच्या जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद लाभो, हीच मंगलकामना.

गेल्या महिन्यात क्लबच्या उपक्रमांनी सेवेची दिशा आणि व्याप्ती दोन्ही वाढवली. तीन शाळांमध्ये रोटाकिड्स क्लबची स्थापना, धानोरा येथे आरसीसी व इंटरॅक्ट क्लब पदग्रहण, इंजिनिअर्स डे निमित्त प्राचार्य व क्लब मधील इंजिनिअर सदस्यांचा गौरव, विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी शिबीर, तसेच धानोरा येथील चार दिवसीय शारदीय व्याख्यानमाला हे उपक्रम उल्लेखनीय ठरले. याशिवाय, इनरव्हिल क्लबसोबत बालनिकेतन विद्या मंदिरातील टिफिन वाटप, रोटाकिड्स जळगाव स्माईल तर्फे रंगभरण, वक्तृत्व स्पर्धा व व्याख्यान आणि क्लब सदस्यांसाठी गणपती आरास स्पर्धा या सर्व उपक्रमांतून सदस्यांचा सहभाग उत्साहवर्धक होता.

ऑक्टोबर महिना रोटरीमध्ये कम्युनिटी डेव्हलपमेंट मंथ म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने आपल्या क्लबमध्ये पद्मश्री चैत्राम पवार यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात येणार आहे. तसेच, रोटरी डिस्ट्रिक्ट पातळीवर उत्कृष्ट पुस्तक परीक्षण स्पर्धा आणि जळगाव जिल्हा पातळीवर उत्कृष्ट पुस्तक वाचक स्पर्धा आयोजित करून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. युवकांसाठी रिल बनविण्याची स्पर्धा व त्या माध्यमातून रोटरी कार्याची व्याप्ती समाजापर्यंत पोहोचविण्याचा मानस आहे. आगामी काळात आपल्यासमोर दोन महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहेत इंटरॅक्ट डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स आणि देशभक्तीपर समूह गीतगायन कार्यक्रम. या दोन्ही उपक्रमांमध्ये आपल्या क्लबचा शंभर टक्के सहभाग अत्यावश्यक आहे.

प्रिय सहका–यांनो, रोटरीचे यश हे सामूहिक प्रयत्नांमध्ये आहे. चला, या ऊर्जेला दिशा देऊ, सेवेमधील सातत्य राखू आणि या वर्षीचा आपला संकल्प साकार करू.

**– रो.गिरीश कुलकर्णी**

# साप्ताहिक सभा

## सप्टेंबर महिन्यातील साप्ताहिक सभा



* दि. १२ सप्टेंबर – या सभेत 'गाईड' ही एकांकिका सादर केली गेली. एका नास्तिक प्राध्यापकाला त्याच्या प्रवासात माऊली सारख्या एका निगरास, आनंदी बालकाच्या सान्निध्याचा स्पर्श होतो अन् त्यामुळे त्यांच्यात कसा बदल होतो हे अतिशय भावपूर्ण व हृदयस्पर्शी चित्रण या एकांकिकेत केलेले दिसते. सुहास दुसाने, अथर्व रंथे यांचा अभिनय व अमोल ठाकूर यांचे लेखन आणि दिग्दर्शन अतिशय सुंदर झाले. या सभेस क्लबच्या सदस्यांची व कुटुंबियांची उपस्थिती अतिशय चांगली होती.

* दि. १९ सप्टेंबर – रोजी ही सभा बिझनेस मिटींग होती. यात एकूण ५००० विद्यार्थ्यांकडून एकत्रित राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीत गाऊन घेणे. तसेच संपूर्ण डिस्ट्रीक्ट लेव्हलवर इंटरॅक्ट क्लबची कॉन्फरन्स आयोजित करणे या दोन महत्त्वाच्या प्रोजेक्ट बद्दल आय.पी.पी. ॲड.सागर चित्रे व रो.डॉ.काजल फिरके यांनी माहिती दिली व त्यावर प्राथमिक चर्चा झाली. नंतर याच वेळी क्लब मधील एकूण १८ इंजिनिअर्स सदस्यांचा 'इंजिनिअर डे' च्या निमित्ताने सत्कार करण्यात आला.





* दि. २६ सप्टेंबर – रोजी रोटरी क्लबने या वर्षापासून अंमलात आणलेला एक उत्कृष्ट आणि उपयुक्त प्रोजेक्ट म्हणजे RIPE (Rotary Ignition Programme in Education) शालेय अप्रगत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी हा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रोजेक्टच्या समन्वयक सौ.वसुधा सराफ आणि इतर १० शिक्षिका यांचा सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर रो.डॉ.राजेश पाटील (डीजीई), रो.डॉ.अपर्णा भट (एजी),अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, मा.सचिव सुभाष अमळनेरकर व लिटरसी कमिटी चेअरमन रो.डॉ.शुभदा कुलकर्णी इ. होते. सौ.वसुधा सराफ यांचे RIPE प्रोजेक्टवरील प्रेझेंटेशन छान झाले. संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे यांचे सहकार्य लाभले.

# प्रोजेक्ट

# सप्टेंबर महिन्यातील प्रोजेक्ट




**✻ दि. १ सप्टेंबर –** जळगाव पासून २५ कि.मी. दूर असलेल्या धानोरा या गावात रोटरी क्लब जळगाव ने पहिला RCC क्लब स्थापन केला. श्री.प्रदीप महाजन यांनी अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारली. यावेळी एकूण १२ सदस्यांचा पदग्रहण समारंभ संपन्न झाला. रो.पी.पी.ॲड.प्रविणचंद्र जंगले (RCC Committee Chair) यांनी प्रास्ताविक केले. पी.पी.रो.जितेंद्र ढाके (President Enclave Chair) यांनी RCC क्लबच्या सर्व सदस्यांना शपथ दिली. अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, मा.सचिव रो.सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे व रोटरी क्लबचे इतर अनेक सदस्य यावेळी उपस्थित होते.

**✻ दि. १ सप्टेंबर–** आज धानोरा येथील झेड.टी.महाजन विद्यालयातील ५ वी ते ९ वी च्या एकूण ४७५ विद्यार्थ्यांना ‘संकल्प–चांगला माणूस बनण्याचा’ या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. पी.पी.रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना चांगला माणूस बनण्याची शपथ दिली. याप्रसंगी रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेरकर, रो.पंकज व्यवहारे, पी.पी.रो.जितेंद्र ढाके, पी.पी.रो.ॲड.प्रविणचंद्र जंगले, रो.सुबोध सराफ, पी.पी.रो.संदीप शर्मा, रो.रितेश जैन, रो.डॉ.पी.एस.पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.





**✻दि.४ सप्टेंबर–** आज रोटरी क्लब जळगाव तर्फे १२ शिक्षकांना नेशन बिल्डर ॲवार्ड देण्यात आला. त्याचप्रमाणे रो.गिरीश कुलकर्णी, संपादित पुस्तक ‘संकल्प–चांगला माणूस बनण्याचा’ याचे प्रकाशनही करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष मा.अशोक जैन, रो.डॉ.राजेश पाटील (DGE), रो.संदीप काबरा व रो.अनिल कांकरीया, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रो.स्वाती ढाके यांनी केले.

**✻ दि.७ सप्टेंबर, २१ सप्टेंबर–** वाचन कट्टा– रोटरी क्लब जळगाव आणि व.वा.वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी वाचन कट्टा हा उपक्रम या वर्षापासून सुरू करण्यात आला आहे. दि. ७/९ रोजी आनंदघर मेहरूण येथे ५ वा आणि दि.२१/९ रोजी आपल्याच रोटरी हॉल मध्ये हा ६ वा उपक्रम संपन्न झाला. विविध लेखकांची विविध विषयांवरील ही पुस्तके वाचल्याने वाचन संस्कृती वाढीला लागत आहे. यासाठी परिश्रम घेणारे आपले अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, प्रकल्प समन्वयक रो.ॲड.आनंद मुजुमदार व इतर अनेक सदस्य यांचे मन:पूर्वक अभिनंदन.



# प्रोजेक्ट

## सप्टेंबर महिन्यातील प्रोजेक्ट



***दि.१५ सप्टेंबर–** रोटा किडस् क्लबची स्थापन– रोटरी क्लब जळगाव तर्फे तीन शाळेत एकूण तीन रोटा किडस्ची स्थापना करण्यात आली. त्यासाठी रोटा किडस् कमिटी चेअर रो.चैताली चौधरी यांचे मन:पूर्वक अभिनंदन. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून रो.डॉ.अपर्णा भट (A.G.) ,रो.जितेंद्र ढाके(Enclave Chair)व अनेक सदस्य उपस्थित होते.

१)रोटा किडस्– स्माईल (शकुंतला विद्यालय)–अध्यक्ष– सागर गोपाळ, उपाध्यक्ष लतिका भोई, सचिव– पायल पाटील.

२)रोटा किडस्–लिटल चॅम्पस् (ज.सु.खडके प्राथमिक विद्यालय)–अध्यक्ष–अनुप परिहार, उपाध्यक्ष–जान्हवी सुरळकर, सचिव– नेहा काळे.

३)रोटा किडस्–फ्युचर बिल्डर्स (का.ऊ.कोल्हे माध्य. विद्यालय)–अध्यक्ष–सुशील अत्तरदे, उपाध्यक्ष–नव्या महाजन, सचिव– कौस्तुभ जगताप.

*** दि. १५ सप्टेंबर–** 'इंजिनिअर्स डे' – रोटरी क्लब जळगाव च्या वतीने इंजिनिअर्स डे च्या निमित्ताने शहरातील एस.एस.बी.टी .इंजिनिअरींग कॉलेज, बांभोरी चे प्राचार्य डॉ.जी.के.पटनायक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास गाजरे, शासकीय तंत्रनिकेतनचे डॉ.पराग पाटील व गोदावरी इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांना त्यांच्या कार्याबद्दल गौरविण्यात आले. व्होकेशनल कमिटी चेअर पी.पी.रो.राजेश वेद, प्रोजेक्ट चेअर पी.पी.रो.संदीप शर्मा, संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.





*** दि. १९ सप्टेंबर–** रोटरी क्लब जळगावच्या सदस्यांसाठी 'गणेश आरास स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती त्याचा बक्षीस समारंभ या साप्ताहिक सभेत पार पडला. पुढील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. (१) रो.डॉ.महेश पाटील, (२) रो.योगेश चौधरी, (३) रो.किशोर जाखेटिया, (४) रो.रितेश जैन, (५) रो.संध्या महाजन.

*** दि. २३/९, २४/९ व २५/९–** आर.सी.सी. क्लब धानोरा तर्फे धानोरा येथे झेड.टी.महाजन माध्यमिक विद्यालय व ना.भा.पाटील कनिष्ठ विद्यालयात शारदीय व्याख्यान मालेचे आयोजन केले गेले.

दि.२३ रोजी– डॉ.सतिश शिंदाडकर

दि.२४ रोजी– रो.गिरीश कुलकर्णी

दि.२५ रोजी– रो.कंवरलाल संघवी



# प्रोजेक्ट

# सप्टेंबर महिन्यातील प्रोजेक्ट




✻ **दि. २४/९–** रोजी धानोरा येथे इंटरॅक्ट क्लबची स्थापना केली गेली. त्यामध्ये समर्थ अनंत पाटील– अध्यक्ष, अभय विकास महाजन–उपाध्यक्ष, इशांत गजानन पाटील–सचिव व बाकी नऊ सदस्य आहेत. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, रो.पंकज व्यवहारे, रो.विश्वजीत बऱ्हाटे व इतर अनेक सदस्य उपस्थित होते.

✻ **दि. २५/९–** धानोरा येथे ३६० विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी आर.सी.सी.धानोरा तर्फे घेण्यात आली. यावेळी शहरातील १६ नामांकित डॉक्टरांचा सहभाग होता. यात पीडीजी रो.डॉ.सिकची, रो.डॉ.जयंत जहागीरदार, डॉ.विकास चौधरी, डॉ.महेश पाटील, डॉ.तुषार फिरके, डॉ.चेतन जैन, डॉ.साधना पाटील, डॉ.चेतना राणे, डॉ.शारदा तायडे यांनी वैद्यकीय तपासणी केली तर त्यांना रो.पंकज व्यवहारे, रो.सुबोध सराफ, रो.संदीप शर्मा, गणेश माळी यांनी सहकार्य केले. विद्यालयाचे चेअरमन श्री.प्रदीप महाजन यांनी सर्व डॉक्टर व सहकारी सदस्य यांचा यथोचित सत्कार केला.






✻ **दि. २४/९, २५/९, २६/९–** रोटा किडस् जळगाव स्माईल (शकुंतला विद्यालय) तर्फे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. १ ली, २ री साठी माझी शाळा व माझी आई हे विषय तर इ.३ री व ४ थी साठी पर्यावरण संवर्धन व माझी शाळा स्वच्छ शाळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रो.चैताली चौधरी या होत्या. विजेत्यांना त्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. त्याचप्रमाणे दि.२४/९ रोजी चित्रकला स्पर्धा व दि.२६/९ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

✻ **दि. २५/९–** रोटरी क्लब, जळगाव आणि इनर व्हील जळगाव ईस्ट या दोन्ही क्लबने संयुक्तपणे कमल राजाराम वाणी बालनिकेतन या शाळेत विद्यार्थ्यांना ५०० स्टेनलेस स्टीलचे टिफिनचे वाटप केले. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, रो.संदीप शर्मा (Non Medical Committee Chair) आणि इनरव्हीलच्या पीडीसी संगीता घोडगावकर, रितू शर्मा तथा वृषाली व्यवहारे व अन्य सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.



रोटरी मंथ निमित्ताने

# डेसीग्नेटेड मंथ- कम्युनिटी इकॉनॉमिक डेव्हलपमेंट

पी.पी.रो.अनुराग जोशी. (इंदौर)



Barkheda village, located about 30 kms from Indore City, is nestled near a small hill where rainwater would flow down every monsoon but was never stored. With no water storage facility, the land turned barren in summer, forcing villagers to migrate along with their cattle in search of grazing pastures.

When the Rotary Club of Indore City identified this pressing problem, our members visited the site and realized that a check dam could transform the situation. However, the estimated cost was beyond the resources of our club alone.

It was under the leadership and guidance of Senior Rotarian Rtn. Dilip Majumdar from Rotary Indore City that the project took shape. Determined to make a difference, our club reached out to our friends in Rotary from Nuremberg, Germany. They were inspired by the idea and together we applied for a Global Grant Project.

With joint efforts, the check dam was built. The results were beyond expectations:
Rainwater began to accumulate instead of flowing away.

The underground water table rose significantly.

The once-barren land turned fertile.

Even in the peak summer months, the dam retained water.

Villagers could sow crops, improve livelihoods, and no longer needed to migrate.

Over time, Goraiyya (sparrows) and other birds built their nests around the dam. Cattle, too, found water nearby. Thus, not only mankind, but birds and animals also no longer needed to move. This made the project a wonderful practice of sustainability and coexistence.

This project not only solved a long-standing problem but also empowered the community to become self-sustaining. It created opportunities for Community Economic Development by improving agriculture, livestock management, and income generation.
Seeing the remarkable success, Rotary Club of Indore City, in collaboration with Rotary Club of Nuremberg, Germany, went on to initiate more Global Grant projects, strengthening the bond of international fellowship and service.

The Barkheda check dam stands as a living example of how Rotary connects the world, transforms communities, and changes lives.

PP. Rtn. *CA Anurag Joshi is a seasoned Chartered Accountant and leading practitioner of direct taxation. He is a senior partner at M/s Purohit & Joshi, specializing in corporate finance, auditing, and taxation.*

*With a CA qualification since 1998 and an MBA, he has been a prominent speaker and corporate trainer for firms like HDFC Bank and BASF, delivering sessions on taxation, working capital finance, and personal finance.*

*He regularly conducts workshops for industry professionals and serves as a panelist for budget discussions at various forums.*

*Beyond his corporate endeavors, CA Joshi has been an active community leader in Rotary International, serving as the President of the Rotary Club of Indore City and later as the Assistant Governor for Rotary District 3040.*

*He led a Rotary Friendship Exchange Program delegation to Sweden in 2024. Through his professional and social engagements, he continues to contribute to financial literacy, corporate finance, and international collaboration.*

## उगवते तारे

# उंच भरारी

**रो.ॲन.डॉ.माधुरी कासट**



माझी मुलगी साक्षी आणि ईशा आमच्या घराचा खरा अभिमान आहे. दोघीही केंद्रीय विद्यालय मधील विद्यार्थिनी आहेत. आज साक्षी विषयी मला अभिमानाने काही गोष्टी सांगायच्या आहेत.

साक्षी केंद्रीय विद्यालय मधील विद्यार्थीनी राहिली असून भारत स्काऊट ॲंड गाईड संस्थेचा राज्य पुरस्कार तिने प्राप्त केला आहे. शालेय जीवनातच तिने शिस्त, नेतृत्व आणि समाजसेवेचा अंगिकार केला. अभ्यासाची तिला खूप आवड आहे आणि नेहमी नवीन नवीन गोष्टी शिकण्याचा तिचा प्रयत्न असतो. आमच्या परिवारामध्ये सर्व डॉक्टर्स आहेत आणि आम्हालाही वाटत होतं की तिने देखिल डॉक्टर व्हावे. नववीपर्यंत तीही म्हणत होती की तिला कार्डिओलॉजिस्ट व्हायचं आहे. शाळेमध्ये वेगवेगळ्या सायंटिफिक प्रयोग स्पर्धा होत होत्या आणि त्यामध्ये ती भाग घ्यायची. त्यात तिचे इनस्पायर ॲवार्ड साठी नॅशनल लेव्हल पर्यंत सिलेक्शन झाले होते. वेस्ट वॉटर मॅनेजमेंट हा तिचा प्रोजेक्ट होता. हा प्रोजेक्ट करत असताना तिला रिसर्चमध्ये जावसं वाटले. चांगले मार्क मिळून सुद्धा तिने नंतर बी फार्म कोर्स करून पुढे रिसर्च फिल्डमध्ये जाण्याचे ठरवले. परंतु आपण कितीहीं ठरवलं तरी नियती वेगळेच आपल्यापुढे मांडत असते. कोविडच्या कठीण काळात मात्र साक्षी खूप व्यथित झाली होती. डॉ. कृष्णा अय्यर सरांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेला तिचा वैज्ञानिक प्रकल्प लॉकडाउनमुळे थांबला आणि ती नीराश झाली. पण तिने हार मानली नाही.तिचा प्लांट बेस्ड रिसर्च थांबून गेला. खूप नैराश्यात तिने काही दिवस काढले. आम्ही डॉक्टर असल्यामुळे आणि तिच्याशी संवाद सतत साधल्यामुळे तसेच आजी–आजोबांचे तिला मार्गदर्शन मिळाले आणि ती पुन्हा एकदा उत्साहाने इंटरनेटच्या साह्याने विविध संस्थांचा शोध घेत काहीतरी नवीन करण्याच्या उद्देशाने तिचे प्रयत्न चालू राहिलं... आणि तिला अमेरिकन केमिकल सोसायटीचा शोध लागला.. आणि मग तिने मागे वळून पाहिले नाही.

साक्षीने बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी मधून बी.फार्मसी पूर्ण केली आणि त्या महाविद्यालयात (American Chemical Society (ACS) च्या Students Chapter ची संस्थापक व अध्यक्षा म्हणून काम केले. तिच्या नेतृत्वामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर संशोधनाची दारे खुले झाली. इंटरनेटच्या मदतीने तिने अमेरिकन केमिकल सोसायटीशी संपर्क साधला, त्यांच्या नियमावली (Bylaws) समजून घेतले, निधी उभारला आणि अनेक विद्यार्थ्यांना सदस्य होण्यासाठी प्रेरित केले. तिच्या पुढाकारामुळे अनेक यशस्वी वेबिनार्स आयोजित झाले. संकटाच्या काळातही तिने चिकाटीने काम करून आपले ध्येय पूर्ण केले, याचा मला प्रचंड अभिमान वाटतो.

साक्षीच्या मेहनतीला आणि अभ्यासू वृत्तीला आंतरराष्ट्रीय स्तरावरही दाद मिळाली. तिला दोन वेळा वॉशिंग्टन आणि सॅन फ्रान्सिस्को येथे संशोधन पत्र सादर करण्यासाठी निमंत्रण मिळाले आणि या दोन्ही प्रवासांचा संपूर्ण खर्च आयोजकांनी केला.

विज्ञानासोबतच साक्षीने कलात्मक आवडही जपली आहे. तिने शास्त्रीय संगीतामध्ये बी.ए. (Visharad Pratham) पदवी घेतली असून ती एक सुंदर कथ्थक नर्तकी आहे. सध्या ती नवी दिल्ली येथील IMI या नामांकित संस्थेत एम.बी.ए. करत आहे. विज्ञान आणि व्यवस्थापन यांचा सुंदर मेळ साधण्याची तिची इच्छा तिच्यामधे स्पष्ट दिसते.

साक्षी केवळ मेहनतीच नाही तर अतिशय संवेदनशील आणि प्राण्यांवर प्रेम करणारी आहे. प्राण्यांची काळजी घेणे, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होणे आणि प्रत्येक गोष्टीकडे उत्साहाने पाहणे हे तिच्या स्वभावाचे वैशिष्ट्य आहे. कोविड काळात तिने एनजीओ जॉईन केले व घरकाम करणाऱ्या लोकांच्या मुलांना तिने ऑनलाईन प्रशिक्षण दिले.

नुकतेच तिचं तिच्या कॉलेज IMI दिल्ली च्या स्टुडंट्स फॉरेन एक्सचेंज प्रोग्रॅम मध्ये सिलेक्शन झालेले आहे व ती दोन महिन्या साठी फ्रान्सला जाणार आहे.

आई म्हणून मला खात्री आहे की तिच्या कष्ट, नेतृत्वगुण, जागतिक दृष्टीकोन, कलात्मकता आणि जिद्दीमुळे ती कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होईल आणि समाजाला नवी दिशा देईल.

या लेखाद्वारे मला सर्व माता–पित्यांना हेच सांगायचं आहे की आपल्या मुलांवर विश्वास ठेवा त्यांच्या इच्छा आकांक्षा आणि अपेक्षा यांना जाणून घ्या व त्यांच्या निर्णयावर प्रयत्नपूर्वक विचार करून त्यांच्याशी विचार विनिमय साधायला पाहिजे. त्यांच्या विचारांना समजून घेणे फार आवश्यक आहे.

आपण सर्व मानतोच त्यांच्या आनंदात आपला आनंद आहे मग त्यांच्या निर्णयातही आपण आनंद मानला पाहिजे.

## बॉलीवुड टाईम्स

### कस्मे वादे

रो.सुबोध सराफ



' आती रहेगी बहारे, जाती रहेगी बहारे, दिल की नज़र से दुनिया को देखो, दुनिया सदा ही हसी है.' अमिताभ, राखी आणि रणधीर कपूर अमिताभ खास प्रोफेसर च्या भूमिकेत ....... शालीन असा रोल आणि डबल रोल तो शंकर या क्रिमिनल चा. खर तर असे खूप सिनेमे आहेत की त्या साठी अमिताभला ॲवार्ड्स मिळायला हवे होते. 'कस्मे वादे ' मला वाटत त्या पैकी एक. प्रोफेसर च्या भूमिकेतील त्याचा संयम. लाजवाब राखी, नितु सिंग, विजयेन्द्र घाटगे, अमजद खान हे पठडीतले कलाकार रणधीर कपूरला मात्र बेस्ट सपोर्टिंग रोल साठी नॉमिनेशन मिळाले होते. १९७८ साली रिलीज झालेला हा सिनेमा हिट ठरला दिग्दर्शक आणि निर्माता 'रमेश बहल'.... यातील गाणी विशेष गाजली . गीतकार 'गुलशन बावरा'.... आणि संगीतकार ग्रेट 'पंचम' त्याने स्वतः गायलेले 'कल क्या होगा किस को पता अभी जिन्दगीका ले लो मझा' रणधीर वर चित्रित झालेले हे गाणे खूप पॉप्युलर झाले.रफी किशोर व आशा ने गायलेले 'मिले जो कडी कडी, एक जंजीर बने, प्यार के रंग भरो, झिंदा तस्वीर बने . हमसफर बन के चलो तो सुहाना हैं सफर जो अकेला हि रहे उसे ना मिले डगर' मोस्ट पॉप्युलरआणि सुपर हिट गाणे या चित्रपटातील म्हणजे टायटल साँग किशोर व लता दीदीने गायलेले लोकप्रियते चा उच्चांक या गाण्याने गाठला होता व आजही गुणगुणावेसे वाटणारे गाणे ' कस्मे वादे निभायेंगे हम, मिलते रहेंगे जनम जनम ओ देखा मैंने तुझ को तो मुझे ऐसा लगा बरसो का खोया हुवा प्यार मुझे मिला तू है दिया मैं हु बाती आजा मेरे जीवन साथी ' या गाण्यात जे ड्रेसेस चेंज केले आहेत अगदी प्रत्येक शब्द शब्दाला दोघांनी ही ड्रेसेस बदलवले आहेत खास अमिताभचे लक्षात राहतात....बाकी सर्व कलाकारांची कामगिरी उत्तम ......अमिताभ दोन्ही भूमिकेत उठून दिसला राखी चा विशेष उल्लेख रणधीरही दखल घेण्या जोगा.' राहुल देव बर्मन यांची उत्कृष्ट कारागिरी....सुंदर गाणी... व अमिताभ ने सुपर हिट केलेला ' कस्मे वादे ' एक छान सिनेमा पाहिल्याचा आनंद देऊन जातो खरा...

## गोल्डन वर्डस्

### Book Review

रो.पंकज व्यवहारे

### The Dip



Author : Seth Godin, Type : Non-fiction

**Best Quotes in the book:** You have only two good choices: Quit or be exceptional. Average is for losers.

**Review:** This is a book about choices. Two choices, really. It's about the decision between quitting, or trying to be the best in the world. It starts with introducing you to the idea that being the best in the world is very underrated. The book ends with a series of questions to help you figure out which dip to pursue, and which dead ends it's time to quit. In this iconic bestseller, popular business blogger and bestselling author Seth Godin proves that winners are really just the best quitters. Godin shows that winners quit fast, quit often, and quit without guilt until they commit to beating the right Dip. Every new project (or job, or hobby, or company) starts out fun...then gets really hard, and not much fun at all. You might be in a Dip a temporary setback that will get better if you keep pushing.

**About the Author -** Seth Godin is the author of nineteen international bestsellers that have been translated into over 35 languages, and have changed the way people think about marketing and work. For a long time, Unleashing The **Ideavirus** was the most popular ebook ever published, and Purple Cow is the bestselling marketing book of the decade.

In addition to his writing and speaking, Seth was founder and CEO of Squidoo.com,. His blog (find it by typing "seth" into Google) is the most popular marketing blog in the world. Before his work as a writer and blogger, Godin was Vice President of Direct Marketing at Yahoo!.

# मा.श्री.अशोक जैन यांना प्रतिष्ठीत विवेकानंद इंटरनॅशनल रिलेशन्स पीस ॲवार्ड प्रदान



मुंबई येथील चक्र व्हिजन इंडीया फाऊंडेशनच्या वतीने आयोजित दिमाखदार पुरस्कार सोहळ्यात कृषी, विज्ञान व तंत्रज्ञान, शाश्वत विकास, देशाच्या विकासात आर्थिक योगदान तसेच मानवतावादी कार्य या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून, ज्यांनी देशाची सीमा ओलांडून जागतिक कल्याण व प्रगती घडवली आहे अशा व्यक्तींना गौरविण्यात येते. दरवर्षी जगातील १० पेक्षा अधिक देशांत आपले कार्य प्रस्थापित केलेल्या भारतीय उद्योगांना विवेकानंद इंटरनॅशनल रिलेशन्स पीस अवार्ड देऊन सन्मानित करण्यात येते.

२०२५-२६ या वर्षाकरिता शेती, शेतकरी आणि समाज उपयोगी कार्यासाठी जैन इरिगेशनच्या कार्याबद्दल जैन इरिगेशन सिस्टिम्स ली चे अध्यक्ष श्री.अशोक जैन यांना विवेकानंद इंटरनॅशनल रिलेशन्स पीस अवार्ड नुकताच मुंबई येथील हॉटेल ताजमहाल पॅलेसच्या सभागृहात एका मोठ्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

अशोक जैन यांच्यासह अम्रीता विश्वविद्यापाठाच्या कुलगुरू माता अम्रीतानंदमयीजी, भारत फोर्जचे चेअरमन बाबा कल्याणी, युपीएल ग्रुपचे चेयरमन विक्रम श्रॉफ, गोदरेज इंडस्ट्रीजचे चेयरमन नादिर गोदरेज, पीडीलाईट इंडस्ट्रीजचे चेयरमन मधुकर पारख, व्हॉकार्ड लि.चे चेयरमन डॉ. हुजेफा खोराखीवाला, क्युके टेक्नॉलॉजीचे चेअरमन मनीष झवर, सीईजी ग्रुपचे कार्यकारी संचालक विश्वास जैन, सुहाना मसालाचे संचालक विशाल चोरडीया यांनाही त्यांनी विविध क्षेत्रात केलेल्या कामाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास पद्मविभूषण व पद्मभूषण डॉ. मनमोहन शर्मा हे प्रमुख अतिथी होते. श्री.अशोक जैन यांना भारतीय सैन्यातील वरिष्ठ अधिकारी लेफ्टनन्ट जनरल अरुण अनंथानारायणन, प्रसिद्ध चित्रपट अभिनेते जॅकी श्रॉफ, पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, रवी अय्यर , वीर अवॉर्ड चे संयोजक  गगन मल्होत्रा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी जैन इरिगेशन चे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन ही उपस्थित होते.

---

**✻ दि. २९ सप्टेंबर - मेडीकल प्रोजेक्ट-** रोजी विष्णूलीला हॉस्पीटल मध्ये १२ गरीब व गरजू नागरिकांचे डोळ्याचे मोतीबिंदूचे ऑपरेशन रो.डॉ.तुषार फिरके यांचे मार्फत मोफत करण्यात आले. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, रो.मानद सचिव सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे, मेडीकल कमिटी चेअरमन रो.डॉ.जयंत जहागीरदार, रो.ॲड.हेमंत भंगाळे व इतर रोटेरीयन सदस्य उपस्थित होते.

---

**✻ ७X७X७** या ऑन गोईंग प्रोजेक्टमध्ये पुढील सदस्यांनी आपापले व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रो.गिरीश कुलकर्णी, रो.पंकज व्यवहारे, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.स्वाती ढाके, रो.डॉ.शमा सराफ, रो.सतीश शिंदाडकर, रो.डॉ.पराग जहागीरदार, रो.डॉ.पवन बजाज, रो.ॲड.सागर चित्रे, रो.ॲड.आनंद मुजुमदार, रो.ॲड.महेश भोकरीकर, रो.राजेश वेद, रो.कंवरलाल संघवी व रो.डॉ.रवि हिराणी. प्रोजेक्ट उत्कृष्टपणे राबविल्यामुळे प्रोजेक्ट चेअरमन रो.सुबोध सराफ व वरील सदस्यांचे अभिनंदन.....!

## यश, निवड, अभिनंदन

* पी.पी.रो.प्रेम कोगटा यांची २०२६-२७ या काळात रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० चे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर यांचे SPECIAL ADVISER म्हणून नियुक्ती झाली आहे.
* ऑनररी मेंबर रो.अशोक जैन,अध्यक्ष जैन उद्योग समूह यांना मानाचा प्रतिष्ठित "Vivekanand International Relations Peace Award" हा सन्मान प्रदान करण्यात आला.
* पी.पी.रो.डॉ.प्रदीप जोशी यांची २०२५ ते २०२८ या काळासाठी व.वा.जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष म्हणून तर रो.डॉ.शुभदा कुलकर्णी यांची सचिव म्हणून बिनविरोध निवड झाली.
* रो.डॉ.सागर जावळे यांना USB Video Ottoscope बद्दल ४ थे पेटंट प्राप्त झाले आहे. तसेच लंडन येथे 'Global Conference on Surgery and Anaesthesia' यात "My Innovations in Hypospadias Surgery" या विषयावर उत्कृष्ट प्रेझेंटेशन केल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे.
* रो.पंकज व्यवहारे यांना नुकतेच ICC Club Career Development Professional चे लायसन्स प्राप्त झाले. करिअर डेव्हलपमेंट मधील अतिशय दुर्मिळ मान्यतां पैकी एक असे हे आहे. जगभरातील फक्त १% करिअर प्रोफेशनल्स हा टप्पा गाठू शकतात.
* रो.दीपक आणि रो.सौ.दीपिका चांदोरकर यांना त्यांनी त्यांच्या ‘चांदोरकर प्रतिष्ठान’ च्या माध्यमातून संगीत क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल ‘दिव्य मराठी’ चा सांस्कृतिक सन्मान प्रदान करण्यात आला.
* रो.डॉ.काजल फिरके यांना रोटरी क्लब जळगाव मिडटाऊन तर्फे ‘नेशन बिल्डर’ अ‍ॅवॉर्ड प्रदान करण्यात आला.
* रो.डॉ.शमा सराफ यांची ‘कर्तृत्ववान महिलांचा प्रेरणादायी प्रवास’ या विषयावर रेडीओ मनभावन 90.8 FM वर RJ शुभांगी यांनी घेतलेली मुलाखत प्रसारीत करण्यात आली.
* रो.मकरंद डबीर, रो.ॲन.सौ.स्नेहा भुसारी, रो.ॲन.सौ.सीमा खिंवसरा यांची ‘उद्यमी सेवा प्रतिष्ठान’ चे कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड झाली.

## सप्टेंबर महिन्यातील १००% उपस्थित सदस्य- अभिनंदन

रो.पराग अग्रवाल, रो.शाम अग्रवाल, रो.सुभाष अमळनेरकर, रो.विश्वजीत बऱ्हाटे, रो.किरण बेंडाळे, रो.ॲड.हेमंत भंगाळे, रो.ॲड.श्रीकांत भुसारी, रो.कमलेश चांदवाणी, रो.योगेश चौधरी, रो.चैताली चौधरी, रो.ॲड.सागर चित्रे, रो.जितेंद्र ढाके, रो.स्वाती ढाके, रो.डॉ.तुषार फिरके, रो.डॉ.शशिकांत गाजरे, रो.योगेश गांधी, रो.रितेश जैन, रो.पंकज जयस्वाल, रो.किशोर जाखेटीया, रो.अशोक जोशी, रो.मनोज जोशी, रो.राघवेंद्र काबरा, रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.गिरीश कुलकर्णी, रो.व्ही.पी.कुलकर्णी, रो.रॉबिन लुल्ला, रो.किशोर मंडोवरा, रो.प्रमोद नारखेडे, रो.डॉ.महेश पाटील, रो.नित्यानंद पाटील, रो.संजीव फडणीस, रो.रंगलाल राठोड, रो.सुबोध सराफ, रो.डॉ.सतीष शिंदाडकर, रो.राजेश वेद, रो.पंकज व्यवहारे, रो.राजेश यावलकर.